## निवडक

### हरमल येथे शिमगोत्सवप्रीत्यर्थ आज 'शंभूराजे' नाटक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २०** : शिमगोत्सव प्रीत्यर्थ वर्ष पद्धतीप्रमाणे श्री राष्ट्रोळी कला वैभव खालचावाडातर्फे शुक्रवार दि. २१ रोजी रात्री ९ वाजता ऐतिहासिक 'शंभूराजे' नाटक, देऊळवाडा श्री रवळनाथ मंदिर सभागृहात होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन भरत वस्त, सहाय्यक दिग्दर्शक देवानंद कुडव, निर्माता दिलीप वस्त, सूत्रधार जयराम वस्त, पार्श्वसंगीत द्वारकानाथ गवंडी नेपथ्य, वेशभूषा श्रीमहालसां नाटयलंकार व ध्वनी नरेश नाईक यांची आहे. या नाटकात दिनेश कोचरेकर, दशरथ वस्त, सुभाष वस्त, गंगेश वस्त, गणेश वस्त, प्रदीप वस्त, अरुण गावडे, साईराज वस्त, रामचंद्र वस्त, महादेव वस्त, परेश वस्त, साई दीप वस्त, वेदांती वस्त, निवेदिता चंद्रोजी व संभाजी राजेच्या भूमिकेत भरत वस्त आहेत. तसेच या नाटकात बालकलाकार पवन वस्त, प्रज्योत वस्त, स्पर्श वस्त, अभिनव वस्त, सार्थक कोचरेकर, श्वेत वस्त व बालसंभाजीच्या भूमिकेत श्रविणा विनायक वास्त यांच्या भूमिका आहेत. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्यवस्थापक श्री राष्ट्रोळी ब्राह्मण देवस्थान खालचा वाडा यांनी केले आहे.

---

### सरकारी प्राथमिक विद्यालय बोर्डे येथे भाऊसाहेब बांदोडकर जयंती

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २०** : भाऊसाहेब बांदोडकर यांच्या जयंतीदिनी विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून सरकारी प्राथमिक विद्यालय बोर्डे, डिचोली येथे पूर्व प्राथमिक विभागाचा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी रघुवीर गुरुदास तेली उपस्थित होते. त्याचबरोबर पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष किरण बोर्डेकर शाळेच्या कार्यकारी मुख्याध्यापिका भारती विशांत पेडणेकर, पालक शिक्षक संघ सभासद प्रीती अभिजीत तोंडले, अवनी अखिलेश देवधर, सानिका शैलेश मदली शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ श्रीमती अश्विनी लामगावकर व सभासद पुनम सदाशिव नाईक व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात चालू शैक्षणिक वर्षामध्ये ज्या स्पर्धा झाल्या त्या स्पर्धांचे बक्षीस वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना सहभागाबद्दल भेटवस्तू देण्यात आली. वर्षभर सर्वाधिक दिवस हजर असलेल्या छोट्या वर्गातून विद्यार्थिनी आर्वी संज्योत नाईक व मोठ्या वर्गातील मीरा अभिजीत तोंडले या दोन्ही विद्यार्थिनींचा व त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन शिल्पा चित्तरंजन माशेलकर यांनी केले. भारती विशांत पेडणेकर यांनी प्रास्ताविक केले. शार्वी शोधन पळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. बक्षिसांचे वाचन अरुणा अरुण सावंत यांनी केले. किरण श्रीकांत बोर्डेकर यांनी शेवटी सर्वांचे आभार मानले.

---

### महामाया कालिका देवस्थानचा आज गुलालोत्सव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २०** : वन–डिचोली येथील श्री महामाया कालिका देवीचा वार्षिक गुलालोत्सव धामस्कर कुटुंबीय (केरी, फोंडा) यांच्यातर्फे यंदा शुक्रवार दि. २१ रोजी साजरा करण्यात येत आहे. सकाळी ९ वाजल्यापासून धार्मिक विधी व देवीच्या अभिषेक पूजेने गुलालोत्सवाची सुरुवात करण्यात येईल. दुपारी १२:३० वाजता आरत्या, १.३० वाजता महाप्रसाद व संध्याकाळी ४.३० वाजता टाळ मृदंगाच्या तालावर व ढोल ताशांच्या मिरवणुकीने देवीचा पालखी सोहळा व गुलालोत्सव संपन्न होईल. तद्नंतर आरत्या व तीर्थप्रसादाने उत्सवाची सांगता करण्यात येईल. यंदा सौ. सुनिधी व श्री. तेजस संदीप एकावडे गुलालोत्सवाचे यजमानपद भूषवतील. सर्व भाविकांनी उत्सवास उपस्थित राहून गुलालोत्सवाचा व श्रींच्या कृपाशीर्वादाचा लाभ घ्यावा, असे धामस्कर कुटुंबीय व श्री महामाया कालिका देवस्थान समिती यांच्यातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

---

### मांद्रे येथे शिमगोत्सवनिमित्त २३ रोजी 'अश्रूंची झाली फुले'

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २०** : मांद्रे बिद्रूबाग येथील श्री गंगाळ देव नाट्य मंडळातर्फे शिमगोत्सवनिमित्त रविवार दि. २३ रोजी रात्री ८.०१ वाजता फिरत्या रंगमंचावर व वसंत कानेटकर लिखित 'अश्रूंची झाली फुले' दोन अंकी नाटक, मांद्रे बिद्रूबाग श्री गंगाळ देव देवस्थान प्रांगणात होणार आहे. या नाटकाचे निर्माता सुभाष आसोलकर,संकल्पना रावजी ोनाडकर,सूत्रधार शंकर आसोलकर, विशेष सहाय्यक सतीश हरमलकर, दिग्दर्शक जयेंद्रनाथ हळदणकर, प्रकाशयोजना रत्नकर साळगावकर, ध्वनीयंत्रणा मुकेश जठार,रंगभूषा साजरो शेटगावकर, वेशभूषा श्याम आसोलकर,रंगमंच श्री म्हाळसादेवी नाट्यलंकार भांडार,पार्श्वसंगीत सागर गवस, नेपथ्य गोविंद आसगावकर व उदेश पेडणेकर, छायाचित्रण सोहम संगीत तर सहायक गोपाळ म्हामल, भिकाजी आसोलकर, कुशल हरमलकर, श्रीपाद आसोलकर, अजय आसोलकर, सतीश गडेकर, प्रमोद हरमलकर, अरविंद आसोलकर, दामुकृष्णा आसोलकर, परेश आसोलकर, अनंत आसोलकर व हनुमंत कोणाडकर आहेत. या नाटकात अनिल आसोलकर, महादेव हरमलकर, हरिश कोनाडकर, नवसो परब, हरिश हरमलकर, रविराज पेडणेकर, नारायण सावंत, राम आसोलकर, श्रीकांत कान्होजी, अमित पेडणेकर, गिताली मातोंडकर व कांचन भिडे यांच्या भूमिका आहेत. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफी संघाला ५८ कोटींचे बक्षीस

## बीसीसीआयने घोषणा केली : भारताने न्यूझीलंडला हरवून १२ वर्षांनी जिंकले विजेतेपद

**मुंबई, दि. २० :**



चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या टीम इंडियाला ५८ कोटींचे रोख बक्षीस दिले जाईल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने हे बक्षीस जाहीर केले आहे. ही रक्कम संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांमध्ये वाटली जाईल.

तथापि, बीसीसीआयने प्रशिक्षक कर्मचाऱ्यांना किती आणि खेळाडूंना किती रक्कम दिली जाईल हे स्पष्ट केलेले नाही. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला

९ मार्च रोजी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केल्यानंतर न्यूझीलंडने ५० षटकांत सात विकेट्स गमावून २५१ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने ४९ षटकांत सहा गडी गमावून लक्ष्य गाठले. रोहितने कर्णधारपदाची खेळी खेळली. त्याने ७६ धावा करून भारताला कठीण परिस्थितीतून बाहेर काढले.

भारताने त्यांचे सर्व सामने दुबईमध्ये खेळले आणि सर्व सामने जिंकले. टीम इंडियाने बांगलादेशला ६ गडी राखून पराभूत करून स्पर्धेत आपल्या मोहिमेची सुरुवात केली. त्यानंतर भारताने पाकिस्तानला ६ विकेट्सने आणि न्यूझीलंडला ४४ धावांनी हरवले. आणि उपांत्य फेरीत त्यांनी ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून पराभव केला.

कर्णधार म्हणून रोहित शर्माचे हे ९ महिन्यांत दुसरे आयसीसी जेतेपद आहे. गेल्या वर्षी २९ जून रोजी त्याने टी–२० विश्वचषकही जिंकला होता. हे त्याचे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफी जेतेपद आहे.

आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या बक्षीस रकमेत ५३ टक्क्यांनी वाढ केली. भारतीय संघाला २.४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजेच अंदाजे १९.५ कोटी रुपये मिळाले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) चॅम्पियन्स ट्रॉफीच्या एकूण बक्षीस रकमेत ६.९ दशलक्ष (सुमारे ६० कोटी रुपये) वाढ केली आहे. विजेत्या संघाव्यतिरिक्त, उपविजेत्या न्यूझीलंड संघाला १.१२ दशलक्ष (सुमारे ९.७२ कोटी रुपये) मिळाले, तर उपांत्य फेरीत बाहेर पडलेल्या ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन संघांना ५६,००० (४.८६ कोटी रुपये) मिळाले.

# राजस्थान रॉयल्सचा रियान पराग कर्णधारपदी

▶ **तीन सामन्यांत संघाचे नेतृत्व करणार : संजूला फलंदाज म्हणून संघात समाविष्ट**

**जयपूर, दि. २० :**



इंडियन प्रीमियर लीगचे सामने सुरू होण्यापूर्वीच राजस्थान रॉयल्स संघाने एक मोठा बदल केला आहे. अष्टपैलू रियान पराग आता संजू सॅमसनकडून कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारेल, जो आतापर्यंत संघाचे नेतृत्व करत आहे. तथापि, संजू सॅमसन देखील फलंदाज म्हणून संघाचा भाग असेल. संघाच्या बैठकीत संजू सॅमसनने स्वतः रियान परागच्या नावाची घोषणा केली. बुधवारी (१९ मार्च) झालेल्या सराव सामन्यात परागने ६४ चेंडूत नाबाद १४४ धावांची तुफानी खेळी केली. यादरम्यान त्याने १० षटकार आणि १६ चौकार मारले.

राजस्थान रॉयल्स व्यवस्थापनाने सांगितले– इंडियन प्रीमियर लीग हंगाम २०२५ मध्ये, संघ व्यवस्थापनाने सुरुवातीच्या सामन्यादरम्यान रियान परागला संघाची कमान देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा परिस्थितीत, २३ रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या पहिल्या सामन्यात रियान पहिल्यांदाच राजस्थानची जबाबदारी सांभाळेल. यानंतर, राजस्थान संघ परागच्या नेतृत्वाखाली २६ रोजी गेल्या वर्षीच्या विजेत्या कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध आणि ३०रोजी पाच वेळा विजेत्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध खेळेल.

व्यवस्थापनाच्या मते, संजू सॅमसन हा रॉयल्सचा एक महत्त्वाचा सदस्य आहे. त्याच्या दुखापतीमुळे त्याला सध्या विकेटकीपिंग आणि फिल्डिंग करण्याची परवानगी नाही. अशा परिस्थितीत, तो लीगच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये फक्त फलंदाज म्हणून संघाचा भाग असेल. अशा परिस्थितीत, पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यानंतर, त्याला पुन्हा संघाची कमान मिळेल.

# फुटबॉलपटू सुनील छेत्रीचे पुनरागमन

▶ **गेल्या वर्षी जूनमध्ये निवृत्ती घेतली होती : भारताचा मालदीववर ३–० असा विजय**

**नवी दिल्ली, दि. २० :**



भारतीय फुटबॉलपटू सुनील छेत्री निवृत्तीनंतर परतला आहे. बुधवारी झालेल्या मैत्रीपूर्ण सामन्यात त्याने मालदीवविरुद्ध पुनरागमन केले. या सामन्यात भारताने मालदीवचा ३–० असा पराभव केला.

भारताचा हा १६ महिन्यांतील पहिला विजय आहे. यापूर्वी, भारताचा शेवटचा विजय १६ नोव्हेंबर २०२३ रोजी २०२६ च्या फिफा विश्वचषक पात्रता फेरीच्या सामन्यात कुवेतविरुद्ध (१–०) झाला होता. त्याच वेळी, मॅनोलो मार्केझ यांच्या प्रशिक्षणाखाली संघाने पहिला विजय नोंदवला आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये मार्केझ यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

सामन्यात राहुल भेकेने ३५ व्या मिनिटाला गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. तर लिस्टन कोलाकोने ६६ व्या मिनिटाला गोल करून संघाला २–० अशी आघाडी मिळवून दिली. गेल्या वर्षी जूनमध्ये निवृत्ती घेतल्यानंतर राष्ट्रीय संघात परतलेल्या ४० वर्षीय छेत्रीने हा दिवस संस्मरणीय बनवला. त्याने ७७ व्या मिनिटाला हेडरने गोल केला, जो भारतासाठी १५२ सामन्यांमधील त्याचा ९५ वा आंतरराष्ट्रीय गोल होता. मालदीव जगात १६२ व्या क्रमांकावर आहे, भारतापेक्षा ३६ स्थानांनी खाली (१२६).

छेत्रीने या महिन्याच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर पुनरागमनाची घोषणा केली होती. गेल्या वर्षी जूनमध्ये कुवेतविरुद्धच्या फिफा विश्वचषक २०२६ च्या पात्रता सामन्यानंतर छेत्रीने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतली. तो आता २५ मार्चपासून सुरू होणाऱ्या एएफसी आशियाई कप २०२७ च्या तिसऱ्या फेरीच्या पात्रता फेरीत खेळेल.

एएफसी आशियाई कप २०२७ पात्रता फेरीच्या तिसऱ्या फेरीत भारताला बांगलादेश, हाँगकाँग, चीन आणि सिंगापूरसह गट क मध्ये स्थान देण्यात आले आहे. त्यांचा पहिला सामना २५ मार्च रोजी शिलाँगमधील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर बांगलादेशविरुद्ध आहे.

# हरमल मळा बॉईजने 'किंग ऑफ क्रिकेट चषक' पटकावले

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**हरमल : श्रेयस इलेव्हन आयोजित विजेत्या मळा बॉईज संघास किंग ऑफ क्रिकेट चषक देताना प्रमुख पाहुणे संतोष कोरकणकर तसेच दादू गडेकर, उल्हास केपकर, प्रकाश गडेकर,चंद्रहास दाभोलकर, सतीश शेडगे व इतर.**

**हरमल, दि. २०** : मधलावाडा येथील श्रेयस इलेव्हन आयोजित हरमल मर्यादित आंतरवॉर्ड क्रिकेट स्पर्धेत खालचावाडा प्रभागातील मळा बॉईज संघाने 'किंग ऑफ क्रिकेट' आकर्षक चषक पटकावला. स्पर्धेत प्रत्येक प्रभागातून दोन संघाना संधी दिली होती.एकूण १८ संघांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख रु. १० हजार व भव्य आकर्षक चषक तर उपविजेत्या श्री गणेश संघ बामणभाटी संघास रोख रु. ५ हजार देण्यात आले. वैयक्तिक गटात सामनावीर रितेश नाईक (मळा बॉयज) उत्कृष्ठ फलंदाज सिद्धेश नाईक (श्री गणेश) उत्कृष्ठ गोलंदाज विशाल वायंगणकर (मळा बॉयज) मालिकावीर वीरेंद्र नाईक (श्री गणेश) यांना मान्यवरहस्ते देण्यात आले.श्रेयस ईलेव्हन संघाने उत्कृष्ठ स्पर्धा आयोजन करून गावातील उदयोन्मुख क्रीडापटूंना संधी दिली, त्याबद्दल प्रमुख पाहुणे संतोष कोरकणकर, अध्यक्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी अभिनंदन केले.

यावेळी बक्षीस वितरण सोहळ्यास माजी पंच दादू गडेकर, उल्हास केपकर, प्रकाश गडेकर, सतीश शेडगे, ९६ रायझर्स संघाचे मालक विनय गडेकर, दामोदर रामजी, बबन कुडव व पत्रकार चंद्रहास दाभोलकर उपस्थित होते. सामन्याचे पंच नाना नाईक, सुनील नाईक, स्कोरर निखिल कुडव,समालोचक प्रकाश केपकर, अक्षय महाले आदींना स्मृतिचिन्ह देण्यात आले. श्रेयस सज्जन गडेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन अक्षय महाले तर श्रेयस इलेव्हनचे सज्जन गडेकर यांनी आभार मानले.

# भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात सृजन सप्ताह साजरा

■ *टीम दैनिक हेराल्ड*




**पर्ये–सत्तरी : सृजन सप्ताहाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलताना कालिदास घाटवळ. सोबत शंकर च्यारी, व्यवस्थापक शिवाजीराव राणे, उपप्राचार्य रावसाहेब राणे व कुष्ठा राणे.**

**साखळी, दि. २०:** पर्ये–सत्तरी येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेच्या श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात सृजन सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहात विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी विविध कलात्मक आणि बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नेहरू युवा केंद्राचे कालिदास घाटवळ हे उपस्थित होते.त्यांच्यासोबत श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत,संस्थेचे खजिनदार शंकर चारी, व्यवस्थापक शिवाजीराव राणे, संस्थेचे सचिव कुष्ठा राणे उपप्राचार्य रावसाहेब राणे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली.उपप्राचार्य रावसाहेब राणे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. तसेच युक्ता गाड हिने प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे सृजन सप्ताहात घेतलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. पाककला स्पर्धेत मयूर साळसकर, वेदांगी च्यारी, द्विती गावडे. पोस्टर स्पर्धेत अलविरा बेग व नीती साळगावकर, सोनम सैनी व प्रिया वागर, वेदांगी च्यारी व साईशा गावस यांना पारितोषिके प्राप्त झाली.

या दोन्ही स्पर्धा राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शिक्षक योगेश गावकर यांनी घेतल्या.

वाद विवाद स्पर्धेत दूर्वा राणेसरदेसाई व नियती नाईक यांना प्रथम, समर्थ कर्पे व समीक्षा नाईक यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.या स्पर्धेचे संयोजक शिक्षक रत्नदीप वेरेकर, वर्षा नाईक व पूजा पाटील होत्या.

केक बनविणे पाककला स्पर्धेत पलक मळीक, माही हजारे, धारणा गावस, दीक्षा राणे यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षक संदेश सावंत व योगेश गावकर होते. पुष्पगुच्छ बनविणे स्पर्धेत युक्ता गाड, जिया केसरकर, शर्वरी नाईक, तेजा माजीक, साईच्छा गोवेकर व सितम गोवेकर यांना प्राप्त झाले. तर या स्पर्धेचे संयोजक शिक्षक अमोल वझे व शिक्षिका प्रिया म्हापसेकर होत्या.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत शिवेश घाडी, श्रेयश बाणावलीकर, समर्थ कर्पे, चैतन्य जोशी, लक्ष्मण पर्येकर,हना शेख या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षिका रक्षमा साळकर व शिक्षिका अनिशा च्यारी होत्या.

रांगोळी स्पर्धेत भूमी पार्सेकर, दिव्या गावस, अर्पिता नाईक, अश्विनी नारोजी, धनराज च्यारी, सहदेव म्हाळशेकर या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजजक शिक्षिका सौ.वैष्णवी गवाणकर आणि शिक्षिका अंकिता गावस होत्या.

टाकाऊतून टिकाऊ स्पर्धेत इशा केरकर, भूमी पार्सेकर, आदित्य गावडे, अनुराग गावस, अश्विनी नारोजी, नियती नाईक या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेचे संयोजक शिक्षिका तृप्ती कवळेकर व बबीता नार्वेकर होत्या.

पोस्टर रंगविणे या स्पर्धेत भूमी पार्सेकर,सोनम सायनी, अलविरा बेग यांना पारितोषिके प्राप्त झाली.या स्पर्धेच्या संयोजक शिक्षिका सुनिता गावकर व शिक्षिका सौ.विविधा हळदणकर होत्या.

यावेळी घाटवळ यांनी मुलांना आपल्या अंगी शिस्त बाळगायला सांगितली. आपल्या पालकांना सदैव मान दिला पाहिजे. त्यांचे ऐकले पाहिजे. मोबाईलचा वापर जास्त न करता गरज असेल तेव्हाच करावा असे सांगितले. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका ममता पडते गावस यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# न्हयबाग येथील रोमटामेळास भाविकांची गर्दी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २०** : पोरास्कडे न्हयबाग येथील प्रसिद्ध शिगमोत्सवातील रोमटामेळ १९ रोजी हजारो भाविकांच्या उपस्थितीत सतीया देवीच्या प्रांगणात बारा गावची बारा रोमटे,ढोल ताशांच्या साथीत पारंपरिक गाणी म्हणत व रोमटामेळ तालगडी, घुमटवादन व रंग उधळत शिगमोत्सव साजरा केला.महिलांनी सतीया देवीची ओटी भरली. तर भाविकांनी देवीला श्रीफळ व पुष्पहार अर्पण केले.

सात दिवसांपूर्वी होळी घालून व हळदोण्याने शिमगोत्सवाला प्रारंभ झाला होता. १९ रोजी सातव्या दिवशी प्रथेनुसार मालपे येथील श्री मुळवीर भुतवाडी, अमई, वळपे, सरमळे येथील माउली, पणशीवाडा, पराष्टे, नानेरवाडा, रवळनाथ पेडणे, न्हयबाग, पोरस्कडे व खाजने व इतर मिळून एकूण बारा रोमटे या ठिकाणी रोमटे दाखल होऊन गुलाल उधळल्याने सगळा परिसर गुलाबी झाला होता.

शेवटी गाऱ्हाणे झाल्यावर सात दिवसीय या शिमगोत्सवाची सांगता झाली. यावेळी गोव्यासह जवळच्या सिंधुदुर्ग मधील भावीकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 198 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .